# पुणे विद्यापीठ

दूरध्वनी क्र. : ०२०-२५६०१२०४
इंजि. : २५६०१२७९
मॅनेज/लॉ/शि.शा. : २५६०१२७६
आर्टस् : २५६०१२९३
सायन्स : २५६०१२७४/कॉमर्स : २५६०१२७५
फार्मसी/मेडिकल : २५६०१२२०

परीक्षा विभाग
टेलिग्राफ : "युनिपुणे"
फॅक्स : ०२० २५६०१२०८
फॅक्स : ०२० २५६०१२०४
वेबसाईट : www.unipune.ac.in
ई.मेल coe@unipune.ernet.in

संदर्भ :परीक्षा/बी.कॉम/बी.ए./बी.एससी./७५ दिनांक: ०४/१०/२०१२

प्रति,
मा. प्राचार्य/प्राचार्या/वरिष्ठ पर्यवेक्षक,
प्रथम वर्ष (बहि:स्थ)/द्वितीय वर्ष/तृतीय वर्ष बी.ए.,बी.कॉम.,बी.एससी.,
बी.एससी. (संगणकशास्त्र), बी.एसस्री. बायोटेक्नॉलॉजी/एल.एल.बी./बी.एस.एल.
परीक्षा ऑक्टोबर /नोव्हेंबर २०१२. [सर्व परीक्षा केंद्रे].

विषय : केंद्रीय मूल्यमापन प्रकल्पाच्या ठिकाणी उत्तरपत्रिकांचे गट्ठे आणून देण्याबाबतचा कालबध्द कार्यक्रम...
प्रथम वर्ष (बहि:स्थ)/द्वितीय वर्ष/तृतीय वर्ष बी.ए.,बी.कॉम.,बी.एससी., बी.एससी. (संगणकशास्त्र), बी.एसस्री. बायोटेक्नॉलॉजी/एल.एल.बी./बी.एस.एल. परीक्षा ऑक्टोबर /नोव्हेंबर २०१२.

महोदय/महोदया,

प्रथम वर्ष (बहि:स्थ)/द्वितीय वर्ष/तृतीय वर्ष बी.कॉम.,बी.एससी., बी.एससी. (संगणकशास्त्र), बी.एसस्री. बायोटेक्नॉलॉजी/ परीक्षा दि.०४.१०.२०१२ पासून व प्रथम वर्ष बी.ए. (बहि:स्थ) दि.१२.१०.२०१२ व द्वितीय व तृतीय वर्ष बी.ए.या परीक्षा दि. १२.१०.२०१२ पासून सुरु होत आहेत. विद्यापीठ अधिकार मंडळाच्या निर्णयानुसार या परीक्षांच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यमापन पत्र संदर्भ क्र. परीक्षा/पनि/१०७, दि. २८/०९/२०१२ नुसार परीक्षा विभाग, पुणे विद्यापीठ,पुणे ७ येथे होणार आहे.

१. महाराष्ट्र विद्यापीठ कायदा, १९९४ कलम ७२ मध्ये नमूद केल्याप्रमाणे, परीक्षेचा निकाल मुदतीत जाहीर होणे आवश्यक आहे. परीक्षेचा निकाल मुदतीत जाहीर होण्यासाठी केंद्रीय मुल्यमापन प्रकल्पाचे काम नियोजित वेळेत पूर्ण होणे क्रमप्राप्त असल्याने ऑक्टोबर/नोव्हेंबर २०१२ च्या परीक्षांच्या उत्तरपत्रिका केंद्रीय मूल्यमापन प्रकल्प केंद्रावर जमा करण्यासाठी आखलेल्या योजनेची अंमलबजावणी प्रत्येक परीक्षा केंद्राने करावयाची आहे. उत्तरपत्रिका केंद्रावर जमा करण्याची योजना पुढे नमूद केल्याप्रमाणे आहे.

...२

२. दररोज ज्या ज्या विषयाची परीक्षा संपेल त्या त्या विषयाच्या उत्तरपत्रिका विभागशः विद्यार्थ्यांच्या बैठक क्रमांकाप्रमाणे (ब्लॉकप्रमाणे) लावून घ्याव्यात. तसेच प्रत्येक ब्लॉकच्या कनिष्ठ पर्यवेक्षकांचा अहवालामध्ये विद्यार्थ्यांच्या प्रवेशपत्रावरील आसन क्रमांक व उत्तरपत्रिकेवरील आसन क्रमांक बरोबर असल्याची खात्री करुन बिनचूक व सुवाच्य अक्षरांमध्ये सदर अहवाल असणे जरुरीचे आहे. कारण त्यांच्या अहवालाला विशेष महत्व आहे. त्यामध्ये कोणत्याही प्रकारच्या संशयाला जागा राहू नये याची काळजी घ्यावी. त्या सर्व उत्तरपत्रिकांचे गठ्ठे विभागावार बांधून ते सर्व गठ्ठे सीलबंद करुन ठेवावेत. कोणत्याही परिस्थितीत दोन वेगवेगळ्या विषयांच्या उत्तरपत्रिका एकाच गठ्ठयात बांधू नयेत.

३. परीक्षा झाल्यानंतर लगेचच जर सदरचे गठ्ठे सीलबंद करण्यात आले नाहीत तर काही गैरप्रकार होण्याची शक्यता असते. त्यासाठी विशेष काळजी घेणे जरुरीचे आहे. सीलबंद केलेल्या गठ्ठयांवर खालीलप्रमाणे माहिती नमूद करावी.

१. परीक्षा केंद्राचे नांव
२. परीक्षेचे नांव
३. विषयाचे नांव
४. विभाग क्रमांक
५. परीक्षा दिनांक व वेळ
६. संबंधित गठ्ठयातील एकूण उत्तरपत्रिकांची संख्या

परीक्षा सुरु झाल्यानंतर सीलबंद केलेले उत्तरपत्रिकांचे गठ्ठे आपल्या महाविद्यालयाच्या प्रतिनिधीमार्फत परीक्षा विभाग, पुणे विद्यापीठाकडे वेळच्या वेळी आणून देण्याची व्यवस्था करावी व त्याची पोहोच पावती घ्यावी.

४. द्वितीय व तृतीय वर्ष बी.ए. परीक्षेच्या संख्याशास्त्र, गणित, भूगोल आदी विज्ञान विद्याशाखेच्या अंतर्गत येणा-या उत्तरपत्रिका द्वितीय वर्ष बी.ए. च्या गठठयात समाविष्ट कराव्यात.

५. पुणे शहर व पुणे जिल्हयातील सर्व परीक्षा केंद्रांनी वरील सर्व परीक्षांचे उत्तरपत्रिकांचे गठ्ठे परीक्षा विभाग, पुणे विद्यापीठ येथे दुपारी १२ ते ४ या वेळत व प्रत्येक विषयाची परीक्षा संपल्यानंतर लगेचच दुस-या दिवशी महाविद्यालयाच्या प्रतिनिधीमार्फत पोहोचते करावेत व त्याची पोहोचपावती घ्यावी-

६. नाशिक शहर व जिल्हयातील सर्व परीक्षा केंद्रांनी वरील सर्व परीक्षांच्या उत्तरपत्रिकांचे गठ्ठे त्या त्या वेळी विद्यापीठाच्या नाशिक येथील विभागीय कार्यालयात पोहोचते करावयाचे आहेत. [ विभागीय कार्यालय नाशिक, पोलीस आयुक्त कार्यालयासमोर, एच.डी.एफ.सी. हाऊसजवळ, महापालिका मार्केट इमारत, तिसरा मजला, नाशिक-४२२००२ ] येथे दुपारी १२.०० ते ४.०० या वेळेत प्रत्येक विषयाची परीक्षा संपल्यानंतर लगेचच दुस-या दिवशी महाविद्यालयाच्या प्रतिनिधीमार्फत पोहोचते करावेत.

७. अहमदनगर शहर व जिल्हयातील सर्व परीक्षा केंद्रांनी उत्तरपत्रिकांचे गठ्ठे त्या त्या वेळी विद्यापीठाच्या अहमदनगर येथील विभागीय कार्यालयात दुपारी १२.०० ते ४.०० या वेळेत प्रत्येक विषयाची परीक्षा संपल्यानंतर लगेचच दुस-या दिवशी महाविद्यालयाच्या प्रतिनिधीमार्फत विभागीय कार्यालय, न्यू कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अहमदनगर येथे पोहोचते करावयाचे आहेत

८.द्वितीय व तृतीय वर्ष बी.ए./बी.कॉम./बी.एस्सी. च्या सत्रांत परीक्षा, पर्यावरण जागृती विषयाची ग्रेड व प्रात्यक्षिक परीक्षांचे गुण विद्यापीठ लेखी परीक्षा सुरु होण्याअगोदर तातडीने विद्यापीठाकडे पाठवून देण्यात याव्यात, परीक्षेचा निकाल जाहीर झाल्यानंतर असे गुण घेतले जाणार नाहीत.

केंद्रीय मूल्यमापन प्रकल्पाचे काम सुरळीत चालून नियोजित वेळेत पूर्ण होण्याच्या दृष्टीने उत्तरपत्रिकांचे गठ्ठे नियोजित ठिकाणी व नियोजित वेळेत येणे आवश्यक असल्यामुळे सर्व परीक्षा केंद्रांनी व विद्यापीठ उपकेंद्रांनी वरील योजनेची काटेकोरपणे अंमलबजावणी करुन विद्यापीठास सहकार्य करावे, ही विनंती.

कळावे,

आपला विश्वासू,

उपकुलसचिव.
(परीक्षा छाननी व तालिनीकरण विभाग)

प्रत माहितीसाठी

१. मा. परीक्षा नियंत्रक, पुणे विद्यापीठ, पुणे ७.

प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी -

१. मा.वित्त व लेखा अधिकारी, पुणे विद्यापीठ, पुणे ७
२. मा.उपकुलसचिव (परीक्षा विभाग)
३. मा. सहाय्यक कुलसचिव (परीक्षा विभाग )
४. कक्षाधिकारी (परीक्षा-वित्त/बी.कॉम./बी.ए./बी.एस्सी./गोदाम विभाग)
५. केंद्र प्रमुख, अहमदनगर व नाशिक उपकेंद्रं.

A1/CAP Collection/30-32